CMYK

राज्यात गुन्हेगारीत घट; न्याय व्यवस्थेत महाराष्ट्र आघाडीवर : मुख्यमंत्री फडणवीस >> पान 2

हरिश राणांच्या मृत्यूनंतर इच्छामरणाची चर्चा; मुंबईत इच्छामरणासाठी आलेत ८५ अर्ज, महापालिका समिती स्थापून घेणार निर्णय >> पान 3

बुलढाणा जिल्हा परिषदेचा ४१.२३ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर >> पान 4

**सुविचार**


मी कधीही ब्रह्मचारी नव्हतो. जर लोकांना तसं वाटत असेल तर तो त्यांचा मूर्खपणा आहे.– ओशो


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 226 ■ गुरूवार, दि. 26 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**धुरंधर: द रिव्हेंजनं जगभरात ७०० कोटींचा आकडा केला पार**

आतील पान

# राज्यात इंधनसाठा मुबलक; पेट्रोल, डिझेल व एलपीजी पुरवठा सुरळीत

## ■ अफवांपासून दूर राहण्याचे अन्न नागरी पुरवठा विभागाचे आवाहन
## ■ इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील इंधनपुरवठ्याबाबत कोणतीही टंचाई नसून पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्या हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल), भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) आणि इंडियन ऑइल (आयओसीएल) यांच्या माध्यमातून राज्यभर इंधनाचे वितरण नियमित आणि सुरळीतपणे सुरू असल्याची माहिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

राज्यातील इंधनसाठ्याची स्थिती समाधानकारक

तेल विपणन कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, २५ मार्च २०२६ रोजी राज्यातील इंधनसाठ्याची स्थिती समाधानकारक असून, पेट्रोलचा साठा २,०५,२३२ किलोलीटर, डिझेलचा साठा ४,६७,६०३ किलोलीटर तर एलपीजीचा साठा ३०,७६७ मेट्रिक टन इतका उपलब्ध आहे. हा साठा राज्याच्या गरजा पूर्ण करण्यास पुरेसा आहे.

तेल रिफायनरींकडून एलपीजीच्या दैनिक उत्पादनात वाढ

तेल रिफायनरींकडून एलपीजीच्या दैनिक उत्पादनात वाढ करण्यात आली असून सर्व उत्पादक कंपन्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे तेल विपणन कंपन्यांना नियमितपणे पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा होत आहे आणि पुरवठा साखळीमध्ये कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही.

इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत

राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा व नियमित साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही. इंधन वितरण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असून संबंधित विभागांकडून सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. याशिवाय, खासगी क्षेत्रातील कंपन्यांकडे देखील पेट्रोलियम पदार्थांचा साठा उपलब्ध असल्याने एकूण पुरवठा अधिक सक्षम झाला आहे.

नागरिकांना आवाहन

नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवा, सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये. भीतीपोटी इंधनाचा साठा करण्याचा प्रयत्न करू नये किंवा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करू नये. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, ज्यामुळे वाहतूक कोंडी किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

तसेच, इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन व संबंधित कंपन्यांकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून यावर नागरिकांनी




विश्वास ठेवावा. कोणतीही शंका किंवा माहिती जाणून घेण्यासाठी केवळ अधिकृत शासकीय माध्यमांवरच अवलंबून राहण्याचे आवाहन अन्न नागरी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

शासनाचे इंधन पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण

सद्यस्थितीत केंद्र व राज्य शासन इंधन पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण ठेवून परिस्थिती प्रभावीपणे हाताळत आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता शांतता व संयम राखून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## आनंदाची बातमी, नवी मुंबई विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढणार

**बेलापूर/प्रतिनिधी :** नवी मुंबई विमानतळ माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या दिवशी म्हणजे २५ डिसेंबर २०२५ रोजी सुरू झाला. या विमानतळावरून २९ मार्च २०२६ पासून दररोज ७६ विमानसेवा उपलब्ध होणार आहेत. विमानसेवांची संख्या वाढत असल्यामुळे नवी मुंबई विमानतळावरील प्रवासी वर्दळही वाढणार आहे. या प्रवाशांच्या सोयीसाठी नवी मुंबई विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढवण्याचे नियोजन वेगाने सुरू आहे. विमानतळावर एक पॅसेंजर इंटरजेंज तयार करण्याचे नियोजन आहे. या इंटरजेंजद्वारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ चार मेट्रो मार्गिकांशी जोडला जाईल.

मुंबई शहर ते नवी मुंबई अशी धावणार असलेली मेट्रो ८ नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडली जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आंतरराष्ट्रीय विमनतळाच्या टर्मिनस दोनपासून ही मार्गिका सुरु होईल आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमनतळाशी जोडली जाईल. मेट्रो आठ वरील स्थानकावर मेट्रो ७ आणि मेट्रो ३ ला जोडणी मिळेल. मेट्रो आठवरून प्रवाशांना मेट्रो ४, मेट्रो २ आणि नवी मुंबई मेट्रो लाईन १ साठी इंटरचेंज मिळणार आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला चार मेट्रो मार्गिकांळशी जोडणी मिळाल्यामुळे प्रवासी मेट्रोद्वारे कुर्ला, लोकमान्य टिळक टर्मिनस, मानखुर्द येथील आंतरराज्य बस टर्मिनसपर्यंत पोहोचू शकतील. सध्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला कोणतेही रेल्वे स्थानक आणि मेट्रो स्थानक नाही. त्यामुळे प्रवाशांना रिक्षा, टॅक्सी, कॅब हे खर्चिक पर्याय वापरूनच विमानताळवर पोहोचता येते अथवा विमानतळावरून पुढे घराच्या अथवा हॉटेलच्या दिशेने प्रवास करावा लागतो. यात वेळ आणि पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होतो. कनेक्टिव्हिटी मिळाल्यावर प्रवाशांच्या अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.

## स्वत: १३ वर्ष कोमात राहिलेल्या हरीश राणामुळे दोघांना जीवनदान

### जाताना नेत्रपटल आणि हृदयाची झडप दान, कुटुंबियांचा स्तुत्य निर्णय

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाची परवानगी दिल्यानंतर हरीश राणा या ३२ वर्षीय तरुणाचा मंगळवारी एम्स रुग्णालयात मृत्यू झाला. न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाची (पॅसिव्ह युथनेशिया) परवानगी दिल्याची भारतातील ही पहिलीच घटना आहे. बुधवारी सकाळी हरीशवर शोकाकुल वातावरणात दक्षिण दिल्लीतील ग्रीन पार्क येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. १३ वर्षे कोमात असलेलआ हरीश अखेर अनंतात विलीन झाला असला तरी अवयव रुपाने तो जिवंत राहणार आहे.

एम्स रुग्णालयात मृत्यू

हरीश राणाचा सायंकाळी चार वाजून १० मिनिटांनी मृत्यू झाल्याचे एम्स रुग्णालयाने वैद्यकीय बुलेटीन काढून जाहीर केले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली हरीशची जीवनरक्षक प्रणाली काढून त्याला सुरु असणारे औषधे देखील बंद करण्यात आली होती. मृत्यू झाल्याची माहिती दिल्यानंतर रुग्णालयाच्या वतीने हरीशला श्रद्धांजली अर्पण करत पालक आणि नातेवाईकांना धीर दिला.

नेत्रपटल आणि हृदयाची झडप दान

हरीश राणाच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांनी एक महत्वाचा निर्णय घेतला. कुटुंबियांनी हरीशचे अवयव दान करण्याचा निर्णय घेत नेत्रपटल आणि हृदयाची झडप दान केले. यामुळे एखाद्या अंध व्यक्तीला दृष्टी परत मिळण्यास मदत होईल, तर हृदयाच्या झडपमुळे गंभीर हृदयरोग असलेल्या रुग्णाला निरोगी जीवन जगण्याचा आधार मिळणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने या महिन्याच्या सुरुवातीला हरीश राणाला इच्छामरणाची परवानगी दिली. १३ वर्षांपासून कोमात असलेल्या हरीशच्या इच्छामरणासाठी त्याच्या पालकांनी न्यायालयाचे दार ठोठावले होते. हरीशचा उपचार वैद्यकीयदृष्ट्या शक्य नसल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले होते. यामुळे हतबल झालेल्या आणि उपचारासाठी आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या पालकांनी हरीशच्या इच्छामरणासाठी न्यायालयात अर्ज केला होता. २०१३ मध्ये हरीश इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरुन कोसळून गंभीर जखमी झाला होता.

न्यायालयासाठी देखील भावनिक निर्णय

निष्क्रिय इच्छामरणात व्यक्तीचा जीवनरक्षक प्रणाली काढून टाकली जाते तसेच, औषधं बंद केली जातात. यामुळे व्यक्तीचा नैसर्गिक पद्धतीने मृत्यू होतो. न्यायालयाने हा निर्णय दिला त्यावेळी न्यायाधीशांना देखील अश्रू अनावर झाले होते. दरम्यान, उपचार सुरु ठेवल्याने रुग्ण बरा होण्याचे कोणतेही संकेत दिसत नाहीत असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. हरीश राणा पंजाब विद्यापीठात बी.टेकचे शिक्षण घेत होता. पण, अपघातानंतर डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तो कोमामध्ये गेला तो कायमचा.

## आयपीएल २०२६: राजस्थाननंतर आरसीबीची विक्री

नवी दिल्ली : आदित्य बिर्ला ग्रुप, टाइम्स ऑफ इंडिया ग्रुप, बोल्ट व्हेंचर्स आणि ब्लॅकस्टोन पर्पेच्युअल प्रायव्हेट लिमिटेड यांनी संयुक्तपणे आयपीएलचे गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळूर (आरसीबी) विकत घेतले आहेत. मंगळवारी राजस्थान रॉयल्सलाही नवीन मालक मिळाला आणि त्यानंतर आरसीबीच्या मालकी हक्कात बदल झाल्याची बातमी समोर आली. या चार कंपन्यांनी युनायटेड स्पिरिट्स लिमिटेडसोबत एक निश्चित करार केला आहे, ज्यामध्ये आरसीबीच्या पुरुष आणि महिला दोन्ही संघांचा समावेश आहे. आरसीबीला १६.७०६ कोटी रुपयांना विकत घेण्यात आले आहे. नवीन मालकी हक्कानुसार, आर्यमन विक्रम बिर्ला हे अध्यक्ष असतील, तर टाइम्स ऑफ इंडियाचे सत्यन गोस्वामी हे फ्रँचायझीचे उपाध्यक्ष असतील. ही अधिग्रहण प्रक्रिया अद्याप पूर्णपणे पूर्ण झालेली नाही. यासाठी आयपीएल आणि डब्ल्यूपीएलची नियामक संस्था असलेल्या बीसीसीआय, भारतीय स्पर्धा आयोग आणि संबंधित संस्थांची मंजुरी आवश्यक आहे. कुमार मंगलम बिर्ला यांचे म्हणाले की, ''गेल्या दोन दशकांत, आयपीएल एक क्रीडा शक्ती म्हणून उदयास आली आहे, जिने भारतीय क्रिकेटमध्ये परिवर्तन घडवले आहे. सध्या, आरसीबी ही एक उत्कृष्ट फ्रँचायझी आहे, जी आदित्य बिर्ला समूहाला जागतिक क्रीडा क्षेत्रात आपला वारसा विस्तारण्याची संधी देते. आम्हाला त्याचे मालक झाल्याचा आनंद आहे.

## राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांचा आंतरराष्ट्रीय 'व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर' पुरस्काराने गौरव

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांना अमेरिकेतील युएस इंडिया एसएमई कौन्सिल तर्फे प्रदान करण्यात येणारा आऊटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर' हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे २५ मार्च २०२६ रोजी आयोजित भव्य समारंभात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या समारंभास अमेरिकेतील मेरीलँड राज्याचे काउंटी एक्झिक्युटिव्ह मार्क अर्लिख, आंध्र प्रदेशचे एमएसएमई व एनआरआय रिलेशन्स मंत्री कोंडापल्ली श्रीनिवास, यूएस इंडिया एसएमई कौन्सिलचे चेअरमन सुधाकर गंधे, सीईओ एलिझा पुलिवार्थी तसेच नीरज खैरवाल




यांची प्रमुख उपस्थिती होती. भारत आणि अमेरिकेतील अनेक उद्योजकही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्यमंत्री साकोरे–बोर्डीकर यांनी परभणी जिल्ह्यासह ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवलेल्या उपक्रमांमुळे त्यांना हा सन्मान मिळाला आहे. महिला उद्योजकांना चालना देणे, 'लखपती दीदी' योजना, 'सिल्क अँड मिल्क' उपक्रम आणि एकल महिला सशक्तीकरण अभियान यांसारख्या उपक्रमांमुळे अनेक महिलांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला झाला आहे.

अमेरिका–भारत आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत असलेली युएस इंडिया एसएमई कौन्सिल ही संस्था लघु व मध्यम उद्योगांना चालना देणे, नाविन्यपूर्ण उद्योजकता वाढवणे तसेच ऊर्जा, पायाभूत सुविधा, शाश्वत विकास, आरोग्य आणि ग्रामीण विकास क्षेत्रात सहकार्य वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

## आशियाई लेक्रॉस स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाचा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडून सत्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सौदी अरेबियातील रियाध येथे संपन्न झालेल्या आशियाई लेक्रॉस स्पर्धेत अजिंक्यपद मिळवून देशाचा तिरंगा फडकवणाऱ्या भारतीय संघाचा आज केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गौरव केला. नवी दिल्ली येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी हा सत्कार सोहळा पार पडला.

भारताची ऐतिहासिक कामगिरी

सौदी अरेबियातील रियाध येथे १ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान आशियाई लेक्रॉस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने



इराकविरुद्ध ९–२ अशा मोठ्या फरकाने विजय मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या संघात देशभरातील १८ गुणवंत खेळाडूंचा समावेश होता.

विजेत्या संघाला आपल्या दिल्ली येथील निवासस्थानी आमंत्रित करून प्रतापराव जाधव यांनी सर्व खेळाडूंशी जिव्हाळ्याने संवाद साधला. यावेळी त्यांनी खेळाडूंच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे कौतुक केले.

याप्रसंगी बोलताना प्रतापराव जाधव म्हणाले की, आज भारत देश सर्वच क्षेत्रांत जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. खेळ क्षेत्रात तुम्ही केलेली ही कामगिरी भारतीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद आणि बहुमोलाची आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव रोशन करणाऱ्या तुमच्यासारख्या खेळाडूंमुळेच भारताची मान उंचावते. केंद्रीय मंत्र्यांनी यावेळी संपूर्ण संघाचे अभिनंदन करून त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुवर्णपदक विजेत्या या संघात विविध राज्यांतील खेळाडूंचा समावेश असून, त्यांच्या या यशाबद्दल देशभरातून कौतुक होत आहे.

**दिग्दर्शक साहेबांनी पुढील प्रसंग 'जेल' चा असल्याचे सांगितले आहे!!**




CMYK

## विरोधकांचे मनसुबेही धुळीस

कालच्या आपल्या संसदेतील भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासमोरील संकट मान्य करण्याबरोबरच, त्यासंदर्भात सरकारने आजवर काय केले आणि भविष्यात काय उपाययोजना करणार आहोत, त्याबद्दल भाष्य केले. देशाला अशा संकटकाळात एकजुटीने सामना करण्याचे सांगत, साठेबाजांवर कारवाईचा कडक इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे मोदी संसदेत येत नाही, युद्धाविषयी स्पष्टीकरण देत नाही, असा अपप्रचार करणाऱ्या विरोधकांचे मनसुबेही धुळीस मिळाले आहेत. नेतृत्वाचा खरा कस संकटकाळातच लागतो, असे म्हणतात. त्या निकषावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या उत्तुंग आणि खंबीर नेतृत्वाचे दर्शन घडविले आहे. काल त्यांनी संसदेत केलेल्या आश्वासक भाषणानंतर भारतीयांना नक्कीच दिलासा मिळाला आहे. पश्चिम आशियाई राष्ट्रांमध्ये सुरू असलेल्या सशस्त्र संघर्षामुळे जगभरातील इंधनपुरवठ्याची स्थिती चिंताजनक झाली आहे. भारताचा या युद्धाशी थेट किंवा अप्रत्यक्षही संबंध नसला, तरी त्याचे विपरीत परिणाम भारताला भोगावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी लोकसभेत या प्रश्नावर भारत सरकारची भूमिका आणि या आपत्तीचा सामना करण्यासाठी सरकारने केलेले प्रयत्न यांची माहिती देऊन देशवासीयांना दिलासा दिला. आपल्या भाषणात युद्धाने प्रश्न सोडविण्यास भारताचा विरोधच राहील, हे मोदी यांनी स्पष्ट केले. तसेच युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगभर होणाऱ्या इंधनाच्या वाहतुकीला होत असलेला अडथळा असमर्थनीय असल्याचे ठासून सांगितले. या अडथळ्यामुळे भारताला मिळणाऱ्या खनिज तेल आणि नैसर्गिक वायूच्या उपलब्धतेवर परिणाम होत आहे. सध्यातरी देशात पुरेसा इंधनसाठा असला, तरी युद्ध लांबल्यास त्याच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ शकतात, याचे सूतोवाचही मोदी यांनी केले. नागरिकांनी इंधनाचा वापर काटेकोरपणे करण्याचे आवाहनही त्यांनी केले. मोदी यांनी देशापुढे आव्हाने असल्याचे मान्य केले. पण, केवळ आव्हाने मोजून न दाखविता आपल्या सरकारने आतापर्यंत कोणते उपाय योजले आणि भविष्यातही आणखी काय करणार, त्याची रूपरेषाही स्पष्ट केली. अशा कठीण काळात लोकांच्या अडचणीचा गैरफायदा घेऊन आपल्या तुंबड्या भरणारेही डोकी वर काढतात. त्यात केवळ व्यापारीच नव्हे, तर राजकीय पक्षांचाही समावेश होतो. देश आणि सरकार अडचणीत सापडणे, ही आपले राजकीय ईप्सित साध्य करण्याची संधी असल्याचे देशातील विरोधी पक्ष मानतात. आतापर्यंत काँग्रेस आणि तिच्या समव्यसनी सेक्युलर पक्षांनी मोदी सरकारवर विनाकारण टीका केली. जणू हे युद्ध मोदी यांनीच सुरू केले आणि देशातील इंधनपुरवठ्यातील अडथळ्यांना मोदीच जबाबदार असल्यासारखी टीका या पक्षाच्या नेत्यांनी केली. त्यांचा सौम्य; पण सूचक शब्दांत समाचार घेताना मोदी यांनी 'कोरोना'प्रमाणे देशाने एकजूट होऊन सध्याच्या संकटाचा सामना करण्याचे आवाहन केले. इराण-इस्रायलच्या युद्धामुळे केवळ इंधनपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही, तर आखाती देशांमध्ये सुमारे एक कोटी भारतीय कामानिमित्त वास्तव्य करून आहेत, त्यांच्या जीवितालाही धोका उत्पन्न झाला आहे. कारण, इराणने आखाती देशांमधील निवासी ठिकाणांवरही 'ड्रोन'द्वारे हल्ले केल्याने या संघर्षात काही भारतीयांचा बळी गेला. शिवाय, जगभरातील व्यापारी जहाजांवरील खलाशांमध्ये भारतीय खलाशांची संख्या फार मोठी आहे. होर्मुझच्या खाडीतील इंधनाच्या जहाजांवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे भारतीय खलाशांचे जीवित धोक्यात येत आहे. काही भारतीय खलाशी या युद्धाचे बळी ठरले असून, त्यांच्या कुटुंबीयांना सरकारतर्फे शक्य ती सर्व मदत पोहोचविली जात आहे, असे मोदी यांनी सांगितले. या युद्धग्रस्त देशांतून भारतीयांना सुखरूप मायदेशी आणण्याचे अवघड कार्यही मोदी सरकारने यशस्वीपणे साध्य केले. अगदी इराणमधूनही त्यांनी एक हजारांवर भारतीयांना मायदेशी आणले. मोदी यांनी नुकताच एक विक्रम नोंदविला. देशात सर्वाधिक काळ सलग सत्तेत राहण्याचा मान मिळविणारे ते एकमेव नेते ठरले आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री ते आतापर्यंतचा पंतप्रधानपदाचा काळ विचारात घेता, ते सलग आठ हजार, ९३१ दिवस सत्तेवर राहिलेले नेते ठरले. ते तसे का राहू शकले, हे मोदी यांनी 'कोरोना' काळ, 'ऑपरेशन सिंदूर' आणि आता आखाती युद्धाच्या काळात दाखविलेल्या नेतृत्वगुणांमुळे स्पष्ट होते. या तिन्ही आपत्ती भारतावर कोसळल्या, त्यास ना भारत जबाबदार होता, ना त्यांची अपेक्षा कोणी केली होती. 'कोरोना' व सध्याच्या आखाती युद्धकाळात अन्य देशांची अवस्था किती बिकट झाली होती आणि आहे ते पाहता, भारतातील स्थिती ही सामान्यच म्हणावी लागेल. तशी ती राखण्यात मोदी आणि त्यांच्या सहकारी मंत्र्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची राहिली आहे. 'कोरोना' महामारी आणि आखाती युद्धाशी ना भारताचा काही संबंध होता, ना अशी काही परिस्थिती उद्भवेल याची कोणालाही काही पूर्वकल्पना होती. त्यामुळे या आपत्तींचा सामना करण्यासाठी सरकारला पूर्वतयारीसाठी काही वेळच मिळाला नाही. तरीही, 'कोरोना' काळात मोदींनी ज्याप्रकारे देशातील परिस्थिती हाताळली आणि त्यावर यशस्वी मात केली; इतकेच नव्हे, तर भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा तेजीत आणली, त्याबद्दल त्यांचे करावे तितके कौतुक कमीच. आताही निम्म्या जगावर इंधनाच्या उपलब्धतेचे संकट उभे राहिले असतानाही भारतातील इंधनाचा पुरवठा सामान्यच राहिला आहे. भारतात सध्या ५३ लाख टनांचा 'स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम'चा साठा असून, तो लवकरच ६५ लाख मे. टनांवर नेण्यात येईल. गेल्या ११ वर्षांत देशातील तेल शुद्धीकरणाच्या क्षमतेतही मोठी वाढ करण्यात आली आहे. ही खरोखर फार मोठी कामगिरी. अन्य देशांची, अगदी प्रगत देशांची स्थितीही आपल्यापेक्षा दयनीय झाली आहे. यावरूनच मोदी यांच्या नेतृत्वाची महती लक्षात येते.नरेंद्र मोदी यांनी देशात अपारंपरिक ऊर्जेच्या वापरावर जोर दिला आहे. तसेच देशभरात मेट्रो रेल्वेचे जाळे उभे केले जात आहे. अनेक ठिकाणी सौरऊर्जेचा वापर केला जात आहे. आता पेट्रोल व डिझेलमध्ये सुमारे २० टक्के इथेनॉल वापरले जाते. त्यामुळे दरवष साडेचार कोटी बॅरल इंधनाची बचत होत आहे. देशभरात घरोघरी वीज पुरविल्यामुळेही डिझेलवर चालणाऱ्या जनरेटरचा वापर घटून १८० कोटी मे. लीटर डिझेलची बचत होत आहे. यासारख्या अपारंपरिक ऊर्जास्रोतांमुळेही खनिज तेलाच्या वापरात घट होत आहे. हेसुद्धा मोदी यांच्या दूरदृष्टीचे द्योतक मानावे लागेल. मोदी महत्त्वाच्या विषयांवर जाहीर भूमिका घेत नाहीत, ते संसदेत येत नाहीत वगैरे बिनबुडाचे आक्षेप विरोधकांकडून घेतले जात होते. कालच्या त्यांच्या भाषणाने विरोधकांच्या या टीकेलाही परस्पर उत्तर मिळाले, ते बरेच झाले!

# राज्यात गुन्हेगारीत घट; न्याय व्यवस्थेत महाराष्ट्र आघाडीवर : मुख्यमंत्री फडणवीस

### ■ दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताची पारदर्शक व निष्पक्ष चौकशी होणार
### ■ विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन, कायदा-सुव्यवस्थेचे बळकटीकरण, गुन्हेगारी नियंत्रण, सायबर गुन्ह्यांवर आळा आणि न्यायव्यवस्थेतील सुधारणा या सर्व क्षेत्रांत राज्य शासन व्यापक पातळीवर काम करत ठोस प्रगती साधत आहे. राज्यात गुन्हेगारीत घट झाली असून न्याय व्यवस्थेत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पोलीस दलाचे सशक्तीकरण आणि जलद न्यायप्रक्रिया यावर भर देत राज्यातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची पारदर्शक व निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणले जाईल, अशी भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत मांडली.

विधानसभेत विरोधी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले. यावेळी त्यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा सविस्तर आढावा सादर करतानाच विविध विभागांसंदर्भातील उपस्थित झालेल्या विविध प्रश्नांबाबत सविस्तर माहिती दिली.

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या प्रकरणाची मुळापर्यंत चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा केली जाईल. नागरिकांनी अशा घटनांबाबत माहिती शासनापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सूक्ष्म फरक ओळखणे आवश्यक असल्याचे सांगत संत परंपरेचा दाखला देऊन अंधश्रद्धेविरोधात समाजाने जागरूक राहावे, असे त्यांनी नमूद केले.राज्यात जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम अंतिम टप्प्यात असून, याबाबतची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**भारतीय न्याय संहितेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर**

राज्यात भारतीय न्याय संहितेची प्रभावी अंमलबजावणी होत असून महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर पोहोचल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ई-साक्ष प्रणालीचा वापर २८ टक्क्यांवरुन वरून ८४ टक्क्यांपर्यंत वाढला असून ६० दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याचे प्रमाण २-३ टक्क्यांवरुन वरून ४६% पर्यंत पोहाचले आहे. महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांत ६० दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याचे प्रमाण जवळपास ८९ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. दोषसिद्धीच्या दरामध्ये ७८ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. यामुळे न्यायप्रक्रियेला वेग मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**गुन्हेगारीत घट; तपास आणि दोषसिद्धीत वाढ**

२०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये खून, चोरी, दरोडे, विनयभंग यासारख्या प्रमुख गुन्ह्यांमध्ये घट झाल्याची माहिती त्यांनी दिली. अपहरण आणि अमली पदार्थ प्रकरणे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढले आहे.

महिलांच्या सुरक्षेबाबत त्यांनी सांगितले की, बेपत्ता झालेल्या मुलींपैकी बहुतांश प्रकरणे प्रेमसंबंध, कौटुंबिक वाद किंवा इतर सामाजिक कारणांशी संबंधित असतात. प्रत्यक्ष अपहरणाची टक्केवारी अत्यल्प (१.८६%) आहे.

अमली पदार्थांविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाई करत २०२५ मध्ये ५६ हजार किलोपेक्षा अधिक जप्ती केल्याचे सांगितले, तसेच ड्रग्स प्रकरणात सहभागी पोलिसांवर थेट बडतर्फीची कारवाई केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**सायबर गुन्ह्यांविरोधात आधुनिक यंत्रणा**

राज्यात वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा उभारण्यात आली असून तपासाची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले.

सायबर गुन्ह्यांमधील आर्थिक 'रिकव्हरी' कमी असली, तरी अत्याधुनिक साधनसामग्रीमुळे तपास अधिक प्रभावी झाला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत २० देशांतून ५१ अत्याधुनिक साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कमांड अँड कंट्रोल सेंटर, सायबर पोलीस ठाणे तसेच सीईआरटी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. 'डिजिटल अरेस्ट'सारखे प्रकार हे फसवणुकीचे प्रकार असल्याचा इशाराही देण्यात आला असून तात्काळ तक्रारींसाठी १०४५ ही हेल्पलाईन उपलब्ध आहे. या प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही गौरव मिळाल्याचे सांगण्यात आले.

अमली पदार्थांविरोधात राज्यात मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. २०२४ मध्ये ४४ हजार किलो, तर २०२५ मध्ये ५६ हजार किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. २०२५ मध्ये १५,९३३ आरोपींना अटक करण्यात आली असून सुमारे ५,५०० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. केवळ आरोपींना पकडण्यापेक्षा संपूर्ण साखळी उघड करण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पोलीस दल बळकट करण्यासाठीही महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. राज्यात एकूण २.३० लाख पदांपैकी २.०६ लाख पदे भरलेली असून १६,६०७ पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत ५० हजारांहून अधिक पोलिसांची भरती करण्यात आली आहे. तसेच १२,९५२ पोलीस घरे बांधकामाधीन असून पोलिसांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

डायल ११२ या आपत्कालीन सेवेचा प्रतिसाद वेळ १५ मिनिटांवरून ६ मिनिटांपर्यंत कमी करण्यात यश आले आहे. 'महानेत्र' या सीसीटीव्ही नेटवर्कद्वारे राज्यभरातील कॅमेरे एकत्रित करण्याचे काम सुरू असून मुंबईत १.८२ लाख गुन्ह्यांच्या तपासात सीसीटीव्हीचा उपयोग झाला आहे. यापैकी ७,२४८ प्रकरणांत सीसीटीव्ही पुरावा निर्णायक ठरला आहे. भविष्यात खाजगी कॅमेरेही या नेटवर्कमध्ये जोडण्याची योजना असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**बारामती विमान अपघात प्रकरणाची सविस्तर चौकशी सुरू**

बारामती तालुक्यातील विमान अपघाताबाबत सरकारकडून सुरू असलेल्या चौकशीची माहिती देताना संबंधित प्रकरण अत्यंत संवेदनशील असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती विमानतळाजवळ लिअर जेट विमान कोसळून तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेची चौकशी केंद्राच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सुरू असून राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडेही तपास सोपविण्यात आला आहे.

प्राथमिक तपासात पायलट आणि सहपायलट यांच्या ब्रेथ ॲनालायझर चाचणीत अल्कोहोल आढळले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मृतांच्या पोस्टमॉर्टम अहवालानुसार अनेक दुखापती आणि भाजल्यामुळे मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. डीएनए तपासणी, विषतपासणी तसेच स्फोटक पदार्थांच्या तपासणीत कोणताही संशयास्पद निष्कर्ष आढळलेला नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विमानाच्या उड्डाणापूर्वी सर्व प्रक्रिया नियमानुसार पार पडल्याचे समोर आले असून पायलटची नेमणूकही आधीच करण्यात आली होती. मात्र बारामती विमानतळावरील अपुरी दृश्यमानता, मर्यादित सुविधा आणि रनवेची स्थिती यांसारखे मुद्देही तपासात विचारात घेतले जात आहेत.

दरम्यान, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी सर्वच पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहे. सीआयडीचा तपास सुरू असून एएआयबीचा अंतिम अहवाल आल्यानंतरच अंतिम निष्कर्ष काढला जाणार आहे. तसेच गरज भासल्यास पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.या प्रकरणी चौकशी पूर्णपणे निष्पक्ष होईल, असा पुनरुच्चार करून कोणताही घातपात किंवा निष्काळजीपणा आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.एफआयआर नोंदणीबाबतही त्यांनी यावेळी स्पष्टीकरण दिले. अपघाताच्या प्रकरणांमध्ये सुरुवातीला एडीआर नोंदवला जातो. तपासात गुन्हेगारी बाबी आढळल्यास त्याचे एफआयआरमध्ये रूपांतर होते. ही कायदेशीर प्रक्रिया असून त्यानुसारच पुढील कारवाई होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रकरणात केंद्र सरकारकडेही पाठपुरावा सुरू असून, आवश्यक ती सर्व मदत राज्य सरकारकडून केली जाईल. अंतिम अहवाल आल्यानंतरच दुर्घटनेमागील नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**साखर उद्योगासाठी मदतीचा निर्णय**

राज्यातील विविध क्षेत्रांच्या विकासासाठी शासनाने महत्त्वाचे निर्णय घेतले असून, शेती, उद्योग, पर्यावरण आणि गृहनिर्माण या क्षेत्रांना चालना देण्यावर भर दिला जात असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

राज्यात साखर उद्योगासमोर एफआरपी देयके आणि पुढील हंगामाबाबत केंद्र सरकारशी चर्चा करण्यासाठी पुढील आठवड्यात बैठक होणार असून, राज्यस्तरावर उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन तातडीने निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठीही पावले उचलण्यात येत आहेत. महाराष्ट्रात देशातील सुमारे ५० टक्के कांदा उत्पादन होते. शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. केंद्राकडून मदत मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मॉरिशसला १ लाख मेट्रिक टन कांदा निर्यातीचा विचार सुरू असून, दीर्घकालीन उपाय म्हणून पिकांचे वैविध्यीकरण करण्यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**विमा न घेतलेल्या शेतकऱ्यांच्या मुदतीत वाढ करण्याचा विचार**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोकणातील आंबा व काजू उत्पादकांना हवामान बदलाचा फटका बसला आहे. नुकसानग्रस्तांना विमा योजनांतून भरपाई दिली जाणार असून, विमा नसलेल्या शेतकऱ्यांनाही मदत देण्यात येणार आहे. किमान मदत १५ हजारांवरून २२ हजार रुपयांपर्यंत वाढविण्याचा विचार आहे. पंचनाम्यानंतर तातडीने मदत जाहीर केली जाईल.

'नमो शेतकरी महासन्मान' योजनेअंतर्गत ९० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात १८०० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. केंद्र व राज्य मिळून आतापर्यंत ५४ हजार कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. धानाला बोनस देण्याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाणार आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

उद्योग क्षेत्रालाही चालना दिली जात असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात देशातील सर्वाधिक एमएसएमई नोंदणीकृत असून, महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. 'महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण २०२५' जाहीर करण्यात आले असून, स्वतंत्र एमएसएमई आयुक्तालय स्थापन करण्यात येणार आहे.

ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स आणि गेमिंग क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होत आहेत. एव्हीजीसी-एक्सआर धोरण राबवणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे. या क्षेत्रात आठ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. मुंबईत 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी' सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

पर्यावरण संरक्षणासाठीही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. मुंबईतील बांधकाम साईट्सवर आयओटी आणि एआय आधारित यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत असून, क्लायमेट ॲक्शन प्लॅनसाठी तीन हजार कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे. पर्यावरण संतुलनासाठी पुढील सात वर्षांत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला आहे. यासाठी जीआयएस आणि उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**मुंबई व मुंबई महानगर वगळता राज्यातील २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमित करणार**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गृहनिर्माण क्षेत्रात नागरिकांना दिलासा देण्यासाठी २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ५०० चौरस फुटांपर्यंत मोफत तर त्यापुढील क्षेत्रासाठी सवलतीच्या दरात नियमितीकरण केले जाईल. 'हाऊसिंग फॉर ऑल' अंतर्गत ३०० चौरस फुट घराचा हक्क देण्यात येणार आहे.

**आरोग्य क्षेत्रात ३७०८ कोटी रुपयांचा प्रकल्प राबविणार**

आरोग्य क्षेत्रासाठी जपानच्या सहकार्याने ३७०८ कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. नवीन वैद्यकीय व नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यात येणार असून, आधुनिक उपकरणे उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

याशिवाय, बदलापूर आयव्हीएफ प्रकरणात ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांचा भत्ता वाढविण्यात आला असून, 'जलयुक्त शिवार २.०' अंतर्गत कामे सुरू आहेत. दिव्यांग प्रमाणपत्र प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी डिजिटल प्रणाली लागू करण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांत ठोस निर्णय घेतले जात असून, शेतकरी, उद्योग आणि सामान्य नागरिकांना दिलासा देण्यावर सरकारचा भर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र देशात एमएसएमईमध्ये अव्वल असून लवकरच १ कोटी नोंदणीकृत उद्योगांचा टप्पा गाठणार असल्याचे त्यांनी सांगितले. एव्हीजीसी एक्सआर (ॲनिमेशन, गेमिंग) क्षेत्रात मोठी गुंतवणूक येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यासमोरील कृषी, उद्योग आणि पर्यावरणीय आव्हानांचा सामना करण्यासाठी ठोस पावले उचलली असल्याचे सांगितले. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## जालना हादरले; आंदोलकाच्या सासऱ्याचा मृत्यू, परिसरात खळबळ



दैनिक आपला विदर्भ



**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरात एक धक्कादायक घटना घडली असून, आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या तरुणाच्या सासऱ्याचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. रामराव पाटील असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनगर समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी दीपक बोऱ्हाडे हे मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषण करत आहेत. त्यांच्या प्रकृतीत सातत्याने बिघाड होत असल्याच्या बातम्या समोर येत होत्या. या पार्श्वभूमीवर कुटुंबीयांवर मोठा मानसिक ताण निर्माण झाला होता.

दरम्यान, जालना शहरातील छत्रपती कॉलनी परिसरात राहणारे रामराव पाटील यांनी आपल्या राहत्या घरी टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, स्थानिकांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, पंचनामा करून मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीवरही चर्चा सुरू झाली आहे.

## आयपीएलपूर्वी केकेआरचा मोठा निर्णय, रिंकू सिंगची उपकर्णधारपदी नियुक्ती

कोलकाता : तीन वेळच्या विजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) संघाने २०२६ च्या आयपीएल हंगामाच्या सुरुवातीपूर्वी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. संघ व्यवस्थापनाने स्फोटक फलंदाज रिंकू सिंगची उपकर्णधारपदी नियुक्ती केली असून, अजिंक्य रहाणे कर्णधारपदी कायम राहील हे स्पष्ट केले आहे. रिंकूला उपकर्णधारपदी नियुक्त करण्याच्या निर्णयावरून असे दिसून येते की, फ्रँचायझीने दीर्घकालीन नेतृत्व योजनेसह पुढे वाटचाल केली आहे. आगामी आयपीएल हंगामापूर्वी, केकेआरचे सीईओ वेंकी म्हैसूर म्हणाले, ''उपकर्णधार म्हणून रिंकू कर्णधार रहाणे सोबत मिळून काम करेल.'' संघाचे नवीन मुख्य प्रशिक्षक, अभिषेक नायर यांनीही या निर्णयाला पाठिंबा दिला. नायर म्हणाले, ''गेल्या अनेक वर्षांपासून मी त्याला एक लीडर म्हणून विकसित होताना पाहिले आहे. संघ नेहमीच त्याच्याकडे आशेने पाहतो. आम्हाला रिंकूला काही जबाबदारी द्यायची आहे. टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर, मला वाटते की ही जबाबदारी त्याच्यावर सोपवण्याची हीच योग्य वेळ आहे.'' रिंकूचा प्रवास अविश्वसनीय राहिला आहे. त्याला २०१८ मध्ये ८० लाख रुपयांना विकत घेण्यात आले होते, पण केकेआरने त्याला आयपीएल २०२५ मध्ये १३ कोटी रुपयांना कायम ठेवले. गुजरात टायटन्सविरुद्धच्या शेवटच्या षटकात पाच चेंडूंवर पाच षटकार मारून रिंकूने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या कामगिरीमुळे तो केवळ स्टारच बनला नाही, तर भारतीय संघात त्याचे स्थानही निश्चित झाले. आज रिंकूला फिनिशर म्हणून ओळखले जाते.

# हरिश राणांच्या मृत्यूनंतर इच्छामरणाची चर्चा; मुंबईत इच्छामरणासाठी आलेत ८५ अर्ज, महापालिका समिती स्थापून घेणार निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीनंतर देशात प्रथमच हरिश राणा या कोमातील व्यक्तीचा मंगळवारी इच्छामरणानं मृत्यू झाला. त्यानंतर इच्छामरणाची देशभरात चर्चा सुरू झाली आहे. ''मुंबईत आतापर्यंत ८५ जणांनी इच्छामरणासाठीचे अर्ज मुंबई महानगरपालिकेकडे केले आहेत. भविष्यात याविषयीची समिती स्थापन केली जाईल. मगच या अर्जांवर कोणताही निर्णय घेतला जाईल'', अशी माहिती आरोग्य समिती अध्यक्ष हरीश भांदिर्गे यांनी दिली.



८५ जणांनी इच्छामरणासाठी केले अर्ज : सर्वोच्च न्यायालयानं २०२३ साली इच्छामरणासंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर राज्य सरकारच्या निर्देशावरून, मुंबई महानगरपालिकेनं विविध प्रभागातील मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे यासाठीचे अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी दिली होती. आतापर्यंत ८५ जणांनी इच्छामरणासाठीचे अर्ज मुंबई महानगरपालिकेकडे केले आहेत. भविष्यात याविषयीची समिती स्थापन केली जाईल. मगच या अर्जांवर कोणताही निर्णय घेतला जाईल, अशी माहिती देखील यावेळी हरीश भांदिर्गे यांनी दिली.

र्ज केलेल्या व्यक्तीच्या आजाराची घेण्यात येणार माहिती - यावेळी बोलताना हरीश भांदिर्गे म्हणाले की, अर्ज केलेली कोणतीही व्यक्ती या क्षणाला गंभीररित्या आजारी नाही. किंबहुना ते निरोगी आणि सुस्थितीत आहेत. भविष्यात कोणतेही आरोग्यविषयक संकट येऊ नये, यादृष्टीनं त्यांनी हे अर्ज केले आहेत. याविषयी विशेष समिती स्थापन करण्यात येणार आहे. समिती त्या व्यक्तीच्या आजाराची माहिती घेणार आहे.

विशेष समिती होणार स्थापन : या प्रकरणांचा अभ्यास करण्यासाठी शासन एक समिती गठीत करणार आहे. ही समिती अर्जदाराच्या आजाराची स्थिती आणि कारणांचा विचार करून इच्छामरणाच्या मागणीवर निर्णय घेईल, असं यावेळी हरीश भांदिर्गे म्हणाले.

अर्ज केलेले सर्व ८५ व्यक्ती सध्या निरोगी आणि सुस्थितीत आहेत. सरकारी समिती याविषयी स्थापन होईल. त्यानंतरच या सर्वांच्या इच्छामरणाचा निर्णय घेतला जाईल.''- हरीश भांदिर्गे, आरोग्य समिती अध्यक्ष, मुंबई

महानगरपालिका

धोरण असणं गरजेचं : एकूण ८५ जणांनी इच्छामरणासाठी अर्ज केले आहेत. मात्र, ही अतिशय वैयक्तिक आणि संवेदनशील माहिती असल्यानं संबंधित व्यक्तींची नावे समोर आलेली नाहीत. याचबरोबर इच्छामरणाबाबत वाढलेल्या अर्जांची संख्या लक्षात घेता या संदर्भात स्पष्ट धोरण असणं गरजेचं असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## रत्नागिरीत शेतकरी आक्रमक; मदत न मिळाल्यास 'वर्षा'वर धडक - राजू शेट्टी यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत मिळावी या मागणीसाठी गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेला संघर्ष आता अधिक तीव्र झाला आहे. शेतकरी रस्त्यावर उतरल्याला सरकारची बेपर्वाई कारणीभूत असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केला.

या आंदोलनादरम्यान पोलिसांनी शेट्टी यांच्यासह ३७ जणांवर गुन्हे दाखल केल्याची माहिती देत त्यांनी संताप व्यक्त केला. ''सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले असून, गुन्हे दाखल करून आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र आम्ही या कारवाईला घाबरणार नाही,'' असा



ठाम इशारा त्यांनी दिला.

तसेच, ''आणखी गुन्हे दाखल झाले, लाठीचार्ज झाला किंवा कठोर कारवाई झाली तरी आम्ही मागे हटणार नाही. २५ मार्च हा विधिमंडळ अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आजही सरकारने मदतीची घोषणा केली नाही, तर थेट 'वर्षा'वर धडक देऊ,'' असा इशारा शेट्टी यांनी दिला. दरम्यान, या इशाऱ्यामुळे प्रशासन सतर्क झाले असून, पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती प्रति बॅरल 100 डॉलरच्या खाली घसरल्या

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील शांततेच्या आशेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती आज पुन्हा एकदा १०० डॉलर प्रति बॅरलच्या खाली घसरल्या आहेत. भारतीय वेळेनुसार सकाळी १०:१५ वाजता, ब्रेंट क्रूडचा व्यापार ९९.१७ डॉलर प्रति बॅरलवर, तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूडचा व्यापार ८८.५१ डॉलर प्रति बॅरलवर होत होता. यापूर्वी, आधीच्या दिवशी, मंगळवारी, ब्रेंट क्रूड १०४.४९ डॉलर प्रति बॅरलवर बंद झाले होते. डब्ल्यूटीआय क्रूडने मंगळवारचा व्यापार ९२.३५ डॉलर प्रति बॅरलवर संपवला होता.आजच्या व्यापाराच्या सुरुवातीला, ब्रेंट क्रूड जवळपास सहा टक्क्यांनी घसरून ९९.८३ डॉलर प्रति बॅरलवर उघडले. व्यापार सुरू झाल्यानंतर लगेचच, ब्रेंट क्रूडच्या किमती ९७.१८ डॉलर प्रति बॅरलपर्यंत घसरल्या. या घसरणीनंतर, ब्रेंट क्रूड तेलाच्या किमतीत वाढ झाली आणि ती क्षणभर १००.०३ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचली. तथापि, त्यानंतर लगेचच, किंमत पुन्हा १०० डॉलरच्या खाली घसरली. सकाळी १०:१५ पर्यंत, ब्रेंट क्रूड तेलाचा व्यापार प्रति बॅरल ९९.१७ डॉलरवर होत होता, ज्यात ५.११ टक्क्यांची घट झाली होती. ब्रेंट क्रूड तेलाप्रमाणेच, वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूड तेलाच्या किमतीतही पाच टक्क्यांहून अधिक घट नोंदवली गेली. डब्ल्यूटीआय क्रूड तेलाचा व्यापार प्रति बॅरल ८८.५३ डॉलरवर सुरू झाला. थोड्याच वेळात, त्याची किंमत प्रति बॅरल ८६.७२ डॉलरपर्यंत घसरली. यानंतर, डब्ल्यूटीआय क्रूड तेलाची किंमत थोडक्यात प्रति बॅरल ८९.३६ डॉलरपर्यंत वाढली. सकाळी १०:१५ पर्यंत, डब्ल्यूटीआय क्रूडचा व्यापार प्रति बॅरल ८८.५१ डॉलरवर होत होता.

# जालन्यात तुर, हरभरा आणि मक्याची खरेदी बंद; शेतकरी अडचणीत

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात बारदाना उपलब्ध नसल्याने नाफेडमार्फत होणारी शेतीमाल खरेदी पूर्णपणे ठप्प झाली आहे. पणन महासंघाच्या माध्यमातून नाफेड आणि राज्य शासनाकडून दरवर्षी खरेदी प्रक्रिया राबवली जाते. यावर्षीही तुर, मका आणि हरभऱ्याच्या खरेदीसाठी केंद्रे सुरू करण्यात आली होती आणि ऑनलाईन नोंदणीही सुरू होती.

मक्याची खरेदी जानेवारी महिन्यात, तर हरभरा खरेदी एक मार्चपासून सुरू झाली होती. जिल्ह्यात मक्यासाठी दहा, हरभऱ्यासाठी तेवीस आणि तुरीसाठी तेवीस खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली होती. मात्र, जिल्हा प्रशासनाने वारंवार मागणी करूनही पणन महासंघाकडून बारदाना उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. परिणामी, संपूर्ण जिल्ह्यात खरेदी प्रक्रिया ठप्प झाली असून शेतकऱ्यांना आपला माल कमी दरात बाजारात विकावा लागत आहे. या परिस्थितीचा फायदा व्यापाऱ्यांना होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. शेतकऱ्यांना हमीभावाऐवजी कवडीमोल दर मिळत असल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. प्रशासनाने तात्काळ बारदाना उपलब्ध करून देऊन खरेदी प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे.




## शब्दकोडे क्र. 91

आडवे शब्द

१. सर्वश्रेष्ठ धर्म ४. या दगडाला मलमलीची उपमा दिली जाते ८. बाराखडीच्या पुस्ताकातच भेटणारा प्राणी १०. सम १२. पाण्याचे हवेत रूपांतर १५. भांडवलशाहीतील प्रमुख घटक १८. जयपराजय १९. डोंगरावरून सतत पडणारा पाण्याचा प्रवाह २०. मान्यतापत्र, अधिकारपत्र २१. पूर्णपणे २३. जळलेले पीक २४. बुजरा २६. दिशादर्शक यंत्र २७. सतत नकार ऐकवणारे वाद्य ३०. कणीदार ३१. पहिला ऋतू ३२. सकस, सत्वयुक्त ३४. जोधळ्याची एक जात ३६. हिंदीतील पण ३८. व्यवस्थित ३९. शिक्षक ४०. दृश्य ४१. दात असताना दुर्मिळ असणारे धान्य ४२. ओशाळलेला ४३. पाणी ४४. एखाद्याची कड घेणे ४५. ताक ४६. सैन्यातील शिपाई ४७. याने कांदे सोलता येतात? ४८. संपूर्ण ४९. साधना ५०. इतर, दुसरे ५१. साठ मिनिटे ५३. संकट आणणारे शस्त्र ५४. आमंत्रक ५५. उत्कर्ष, प्रगती ५७. संध्याकाळ ५९. बाजेची कापडी पट्टी ६२. तृण ६३. निरुपयोगी लोकांची भरती ६५. मौज ६७. आदिमाया ६८. नुकतेच सरलेले दिवस ६९. जेमतेम, मोठ्या मुश्किलीने ७१. निस्तरता न येणारी साडी किंवा भानगड ७२. पद्धत

उभे शब्द

१. तप्त होणारा डोक्याचा भाग २. व्रत ३. भांबावलेला ५. गणपती ६. होकार, संमती ७. रत्नांची माळ ८. मिळून येणे ९. लबाडीचा हेतू ११. हा प्राणी रामायणकाळातही होता म्हणतात १३. न जाणो याच्या उच्चाराने ब्रह्महत्या व्हायची! १४. आकाश १६. विशेष १७. 'नकोसा' नवरा १९. धमकी, तंबी २१. मर्यादा २२. संध्याकाळ २५. सुकामेव्यातील एक फळ २७. लीन २८. अर्धा 'र' २९. एक क्षार ३३. नारळाचे झाड ३४. संकट दूर करणारा ३५. आश्वासन ३७. मगज ३८. कोथिंबीरीचे बी ३९. कैफी, नशा अणणारा ४०. मंदिर ४१. चाक ४२. साडेसातीचा ग्रह ४३. द्वाड, खोडकर ४४. कित्येक ४५. सूर्य ४६. युद्धजन्य स्थितीत मोठ्या प्रमाणावर राबवली जाणारी ष्करी मोहीम ४८. सोददित ४९. तमाशातील कलाकार ५१. चांदणी ५२. सटवाई ५३. हत्तीची चाल ५६. पुष्कळ ५८. गतकाल ५९. आकाश ६०. माळकरी ६१. रबरी चपला



### शब्दकोडे क्र. 90 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रामबाण ४.उभयता ७.गाजरपारखी ११.उशीर १२.गरज १३.जरतर १४.काहूर १५.नभ १८.वाह्यात २०.सरवा २२.मिशा २३.राबडी २४.रीस २५.मिठी २७.रमारम २९.तहहयात ३१अ.दाब ३२.सान ३३.मारवा ३५.माळ ३६.वसाहत ३८.कलागत ३९.कलाकार ४१.चलन ४२.सरडा ४३.वाटचाल ४५.चटकन ४७.नव ४८.नश्वर ५०.कलकलाट ५१.खास ५३.कालव ५४.परतपरत ५७.ललना ५८.दारू ६०.मटका ६१.तडक ६३.रखरख ६४.नागर ६७.बाप ६९.रक्षा ७२.कावरा-बावरा ७४.साखरी ७५.रवाळ ७६.टवाळी ७७.सजा

उभे उत्तर

१.राऊ २.मशी ३.बारकावा ४.उर ५.भाजप ६.तान ७.गाज ८.जरतारी ९.रत १०.पारवा १४.कळ १६.भर १७.खोडी १९.तनमनधन २१.रत्नाकर २४अ.सरबत २५.मित्र २६.देह २८.रमातल २९.तळतळात ३०.हस्तक ३१.तवका ३१अ.दाह ३३.मानस ३४.वाकडा-तिकडा ३५.माव ३७.सारवान ४०.लाटी ४१.चलनवलन ४४.टवका ४५.चटपट ४६.कशात ४९.रवाना ५०.कर्जदार ५१.खार ५२.सतत ५५.रकाना ५६.पगार ५९.रुखरुख ६०.मखर ६२.डरकाळी ६५.गरळ ६६.आरास ६७.बाव ६८.परात ७०.क्षार ७१.खाट ७३.बाजा

# बुलढाणा जिल्हा परिषदेचा ४१.२३ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद बुलढाणा यांचा सन २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा रु. ४१ कोटी २३ लाखांचा मूळ अर्थसंकल्प सामान्य सभेत मंजूर करण्यात आला. मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांनी अर्थसंकल्प सादर केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक गुलाबराव खरात यांनी त्यास मंजुरी दिली.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) कोल्हे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा कृषी विकास अधिकारी अंगाईत, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

हा अर्थसंकल्प मुद्रांक शुल्क अनुदान, जमीन महसूल अनुदान, गुंतवणुकीवरील व्याज व इतर उत्पन्न यांचा विचार करून तयार करण्यात आला असून, जिल्हा परिषदेच्या गुंतवणुकीवरील व्याजातून उत्पन्नात वाढ झाल्याने यंदाचा अर्थसंकल्प वाढीव आहे. शासन नियमांनुसार खर्चात समाज कल्याणासाठी २० टक्के, महिला व बाल कल्याणासाठी १० टक्के, देखभाल-दुरुस्ती २० टक्के, दिव्यांग कल्याण ५ टक्के, शाळा दुरुस्ती ५ टक्के, समृद्ध पंचायत अभियान १० टक्के व ई-गव्हर्नन्ससाठी ०.५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

दिव्यांग कल्याणासाठी ८५ लाख तर मागील अनुशेषासाठी २.०८ कोटींची तरतूद. तसेच राजमाता जिजाऊ जयंती, संत चोखामेळा जयंती, पातुर्डा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श सोहळा, सैलानी यात्रा आदी सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांसाठीही निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाद्वारे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

### विभागनिहाय तरतूद पुढीलप्रमाणे

- बांधकाम विभाग ६.७३ कोटी
- शिक्षण ३.५८ कोटी
- सार्वजनिक आरोग्य ५९ लाख,
- ग्रामीण पाणीपुरवठा ४.०५ कोटी,
- महिला व बाल कल्याण १.१२ कोटी
- समाज कल्याण २.०६ कोटी
- दिव्यांग कल्याण ८५ लाख (अनुशेष २.०८ कोटी)
- कृषी ८१ लाख
- पशुसंवर्धन ६४ लाख
- सामान्य प्रशासन २.९० कोटी
- वित्त ७१ लाख
- पंचायत ४.३१ कोटी
- लघु पाटबंधारे १.८१ कोटी.

### ठळक योजना

- 'सीईओ संग्राम योजना' अंतर्गत १०० संवेदनशील ग्रामपंचायतींसाठी ५१ लाखांचे प्रोत्साहन.
- 'मिशन ' अंतर्गत गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ५० लाखांची तरतूद;
- १०० विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशासाठी कोचिंग.
- विधवा, परित्यक्ता व एकल महिलांसाठी सहाय्य अनुदान योजनेसाठी ५० लाख; सुमारे १००० महिलांना लाभ.
- बायोगॅस योजनेसाठी ४० लाख; १३ तालुक्यांतील सुमारे १३० लाभार्थ्यांना फायदा.
- २९३ अर्धवेळ स्त्री परिचारिकांसाठी गणवेश व भाऊबीज भेटीसाठी ६ लाखांची तरतूद.

## वृत्तविशेष...

## बुलढाण्यात ५६०३ शासकीय कार्यालयांकडे २७०.७८ कोटींची वीज थकबाकी; महावितरणचा कडक इशारा






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील वीजबिल थकवणाऱ्या शासकीय व सार्वजनिक सेवा देणाऱ्या कार्यालयांवर महावितरणने आता कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. वारंवार सूचना, स्मरणपत्रे, प्रत्यक्ष पाठपुरावा तसेच नोंदणीकृत मोबाईलवर संदेश पाठवूनही अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने महावितरणने थकबाकीदारांविरोधात थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. थकबाकी न भरल्यास संबंधित कार्यालयांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकूण ५ हजार ६०३ शासकीय कार्यालयांकडे तब्बल २७० कोटी ७८ लाख रुपयांची वीज थकबाकी असल्याची माहिती समोर आली आहे. ही थकबाकी तातडीने भरून सहकार्य करावे, असे आवाहन अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके यांनी केले आहे. दरम्यान, शासकीय कार्यालयांकडून वीजबिल भरण्याकडे होत असलेली उदासीनता चिंताजनक असून त्याचा अतिरिक्त ताण महावितरणच्या कर्मचाऱ्यांवर पडत असल्याचेही दिसून येत आहे. थकबाकी वसुलीसाठी महावितरणने आता अधिक आक्रमक भूमिका घेतल्याने येत्या काळात अनेक कार्यालयांचा वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बुलढाणा क्षय आरोग्यधाम येथे जागतिक क्षयरोग दिन साजरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जागतिक क्षयरोग दिनानिमित्त क्षय आरोग्यधाम, बुलढाणा येथील रुग्णालयात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. १९८२ पासून दरवर्षी २४ मार्च रोजी साजरा होणाऱ्या या दिनानिमित्त यंदाची ''होय! आम्ही क्षयरोगाचा अंत करू शकतो : देशांच्या नेतृत्वाखाली लोकांच्या मदतीने'' ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व डॉ. रॉबर्ट कोच यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच. आर. खान यांनी क्षयरुग्णांची सद्यस्थिती, आकडेवारी तसेच शासनाकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात रुग्णालयाचे वरिष्ठ लिपिक दत्तात्रय वाघमारे यांनी क्षयरुग्णांवरील स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आहार तज्ञ डॉ. मयुरी देशमुख यांनी रुग्णांना प्रथिनयुक्त आहाराचे महत्त्व समजावून सांगत योग्य आहाराचे मार्गदर्शन केले. यावेळी क्षयरोगावर मात केलेल्या रुग्णाची प्रेरणादायी व्हिडिओ क्लिपही दाखविण्यात आली. याशिवाय, परिसेविका मीना जोंधळे यांच्या वतीने प्रोटीन पावडर तसेच अधिपरिचारिका सोनाली दाबेराव यांच्या वतीने एनर्जी ड्रिंकचे रुग्णांना वाटप करण्यात आले.

डॉ. सुशील चव्हाण यांनी क्षयरोगाविरुद्ध लढण्यासाठी रुग्णांना सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कालिंदा जायभाये यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामनंदन चव्हाण यांच्यासह सर्व कर्मचारीवर्गाने परिश्रम घेतले. यावेळी डॉ. आनंद कोठारी व डॉ. मोहिनी खेडेकर यांचीही उपस्थिती होती.

## गोव्याची दारू गुजरातला, तस्करांनी पुष्पा स्टाइलनं डोकं चालवलं,पण महाराष्ट्रात पोलिसांनी गेम केला

कर्जत - पुष्पा हा चित्रपट प्रत्येकाच्या पसंतीचा होता आणि त्यात दाखवल्याप्रमाणे तस्करीचे प्रकार सर्वांनाच ठाऊक आहेत. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर काही ठिकाणी पुष्पा स्टाईल चोरीच्या घटना समोर आल्या होत्या. सध्या असाच एक प्रकार उघडकीस आला असून महाराष्ट्र पोलिसांनी हा संपूर्ण कट हाणून पाडला आहे. ज्यात गोव्याहून गुजरातकडे टँकरमधून अवैधरित्या दारू वाहतूक केली जात होती. गोव्यातून मोठ्या प्रमाणात मद्यसाठा हा गुजरातकडे तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर रायगड पोलिस अधीक्षक आँचल दलाल, अपल पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहूल गायकवाड या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली नेरळ पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांनी एक पथक तयार केले.

या विशेष पथकाने कर्जत-मुरबाड आणि शहापूर राज्य महामार्गावर सापळा रचला आणि तपासणी सुरु केली.

## धुरंधर: द रिव्हेंजनं जगभरात ७०० कोटींचा आकडा केला पार

हैदराबाद: धुरंधर: द रिव्हेंज बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई करत आहे. हा चित्रपट आता रुपेरी पडद्यावर आपले वर्चस्व कायम ठेवत आहे. रणवीर सिंग, संजय दत्त, अर्जुन रामपाल, आर. माधवन, सारा अर्जुन आणि राकेश बेदी यांच्या प्रमुख भूमिका असलेला स्पाय अ‍ॅक्शन थ्रिलर धुरंधर: द रिव्हेंज प्रदर्शित झाल्यानंतर चर्चेत आहे. हा चित्रपट १९ मार्च रोजी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटानं जोरदार कमाई करून आता बॉक्स ऑफिसवर एक विक्रम रचला आहे. धुरंधर: द रिव्हेंज चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांची गर्दी खूप वाढल्याची दिसत आहे. आता धुरंधर: द रिव्हेंजनं पहिल्या वीकेंडमध्ये किती कमाई केली, याबद्दल आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर रिलीज होईन चार दिवस पूर्ण झाले आहेत. या चित्रपटाचं पेड प्रिव्ह्यू १८ मार्च रोजी सुरू झाले होते.

धुरंधर: द रिव्हेंजची कमाई : सॅकनिल्कनुसार, धुरंधर: द रिव्हेंजनं पेड प्रिव्ह्यूच्या दिवशी ४३ कोटी, पहिल्या दिवशी १०२.५५ कोटी, दुसऱ्या दिवशी ८०.७२ कोटी, तिसऱ्या दिवशी ११३ कोटी आणि चौथ्या दिवशी (पहिला रविवार) ११४.८५ कोटी कमावले. यासह, पेड प्रिव्ह्यूसह, धुरंधर: द रिव्हेंजची भारतातील एकूण कमाई ४५४.१२ कोटी आणि जगभरातील एकूण कमाई अंदाजे ७०० कोटी आहे. आपल्या पहिल्या वीकेंडमध्ये, धुरंधर: द रिव्हेंजनं शाहरुख खानच्या पठाणला (२८७ कोटी) मागे टाकले. आपल्या जगभरातील कमाईसह, या चित्रपटानं गदर २ (६९१ कोटी) आणि सालार (६९० कोटी) यांचे विक्रम मोडले. धुरंधर: द रिव्हेंजनं आपल्या ओपनिंग वीकेंडमध्ये परदेशात २२ दशलक्ष डॉलर्सची कमाई केली, ज्यात एकट्या उत्तर अमेरिकेतील ९.६ दशलक्ष डॉलर्सचा समावेश आहे.

## बुलढाण्यात अफू शेतीचा भंडाफोड; ११.४७९ किलो अमली पदार्थ जप्त, तरुणाला अटक



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या 'मिशन परिवर्तन' मोहिमेत पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. अंढेरा पोलीस ठाणे हद्दीत करण्यात आलेल्या धडक कारवाईत ११ किलो ४७९ ग्रॅम अफू जप्त करण्यात आली असून, या प्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थाची किंमत सुमारे ₹९ लाख १८ हजार ३२० इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेला अंढेरा परिसरात एका शेतात बेकायदेशीर अफूची लागवड सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे २५ मार्च २०२६ रोजी पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकत कारवाई केली. छाप्यात शेतात मोठ्या प्रमाणात अफूची झाडे आढळून आली. तसेच त्यापासून तयार करण्यात आलेला अफू पदार्थही पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी कृष्णा हरिराम वाघमारे (वय २६, रा. साखर खेर्डा, जि. बुलढाणा) याला अटक करण्यात आली आहे. आरोपीने स्वतःच्या शेतात अफूची लागवड करून त्याचा साठा विक्रीसाठी ठेवला असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे.

पोलिसांनी आरोपीविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ अंतर्गत कलम ८ (क), १८ (क) अन्वये गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. या अमली पदार्थाच्या जाळ्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा व अंढेरा पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्तपणे पार पाडली. पोलिसांच्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायावर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जिल्हा परिषद शाळांच्या नवपरिवर्तनासाठी 'झेप' उपक्रमाची सुरुवात

### शिक्षकांची उपक्रमशीलता म्हणजे सृजनशील संशोधन -मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद शिक्षकांची नाविन्यपूर्ण उपक्रमशीलता ही सृजनशील संशोधनाचेच एक रूप असून, या माध्यमातून आगामी शैक्षणिक सत्रात जिल्हा परिषद शाळांमध्ये आमूलाग्र बदल घडेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी व्यक्त केला.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा नियोजन सभागृहात ''झेप या अभिनव संकल्पनेतून जिल्ह्यातील १५० नाविन्यपूर्ण शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली ठग, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. मारुती गायकवाड, व्याख्याते गजानन राऊत, उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, शेख अकिल आदी मान्यवर उपस्थित होते.

गुलाब खरात पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद शिक्षक विविध प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. मात्र या उपक्रमांना व्यापक व्यासपीठ मिळत नाही. ''झेप'' उपक्रमाच्या माध्यमातून अशा उपक्रमांचे आदानप्रदान करून एका शाळेतील चांगले प्रयोग दुसऱ्या शाळेत पोहोचवण्याची व्यवस्था निर्माण केली जाणार आहे.

प्रास्ताविकात प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. प्रशासन शिक्षकस्नेही राहील, तर शिक्षकांनी विद्यार्थीस्नेही बनून शाळांचा पट वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. जगराम भटकर यांनी मार्गदर्शन केले, तर गजानन राऊत यांनी प्रेरणादायी उद्बोधन केले. कार्यशाळेत निवडक शिक्षकांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे यांनी केले, तर आभार उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## नांदुरा येथे राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे) अंतर्गत, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि तेंग सु-डो स्पोर्ट्स असोसिएशन, नांदुरा यांच्या तांत्रिक व आर्थिक सहकार्याने राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो (१४, १७ व १९ वर्षांखालील मुले-मुली) क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन २४ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

नांदुरा येथील नगर परिषदेच्या छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन शहराच्या प्रथम नागरिक आणि नगराध्यक्षा मंगलाताई सुधीरजी मुऱ्हेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी आदित्यकुमार सिंह, पोलीस निरीक्षक पावरा, मुख्याधिकारी मिलिंद दरोकार, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर, तेंग सु-डो असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष रॉकी डिसोजा आणि स्थानिक असोसिएशनचे अध्यक्ष सुधीरभाऊ मुऱ्हेकर उपस्थित होते. तसेच शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी रामभाऊ कोलते, सचिव अनिल अंबुसकर, उपाध्यक्ष विजय अंबुसकर यांच्यासह राज्यभरातील क्रीडा अधिकारी व तांत्रिक पंचांची उपस्थिती होती.

भव्य रॅली आणि शिस्तबद्ध नियोजन स्पर्धेच्या प्रारंभी नांदुरा शहरातून खेळाडूंची भव्य रॅली काढण्यात आली, ज्याने शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले. उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्व. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय खेळाडू किरण अंबुसकर याने सर्व सहभागी खेळाडूंना क्रीडा शपथ दिली.

महाराष्ट्रातील विविध विभागांतून सुमारे ५०० खेळाडू, संघ व्यवस्थापक आणि पंच सहभागी झाले आहेत. खेळाडूंसाठी प्रथमच वातानुकूलित निवास व्यवस्था आणि उत्तम भोजनाची सोय करण्यात आली आहे, ज्याचे खेळाडू व पालकांनी कौतुक केले. आमदार चैनसुख संचेती यांनी या स्पर्धेसाठी स्थानिक विकास निधीतून ५ लाख रुपयांची मदत जाहीर केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी प्रास्ताविकात स्पर्धेच्या आयोजनामागची भूमिका विषद केली. आदित्यकुमार सिंह आणि रॉकी डिसोजा यांनी खेळाडूंना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा अधिकारी रवींद्र धारपवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय अंबुसकर यांनी मानले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मीकांत यादव, मिलिंद काटोलकर, प्रशांत मंडले, संदीप केळे, डॉ. जीवन मोहोड आणि तेंग सु-डो असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले आहेत. ही स्पर्धा २५ मार्चपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.